। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १२३ वा । मंगळवार दिनांक २१ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# शिबिरातून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ द्या -जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव,दि.२० जुलै (जिमाका) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरांद्वारे विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,अपर पोलिस अधीक्षक श्री.पांडकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की,२२ जुलै रोजी उमरगा,२४ जुलै रोजी धाराशिव विधानसभा मतदारसंघासाठी शिराढोण येथे,२६ जुलै रोजी तुळजापूर येथे आणि २ ऑगस्ट रोजी भूम येथे शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांसाठी निश्चित केलेल्या ठिकाणी ही शिबिरे होणार असून, प्रत्येक विभागाने आपल्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांना याच ठिकाणी उपलब्ध करून द्यावा.यासाठी सर्व विभागांनी आतापासूनच योजनानिहाय लाभार्थ्यांच्या याद्या अंतिम कराव्यात.आरोग्य विभागाने आयुष्मान कार्ड,भूमी अभिलेख विभागाने स्वामित्व सनद,तर कामगार विभागाने ई-श्रम कार्ड शिबिरस्थळीच तयार करून मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरित करावेत.तसेच आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचेही आयोजन याच कार्यक्रमांतर्गत करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

२२ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या शिबिरांसाठी संबंधित विधानसभा मतदारसंघांतील तालुकानिहाय लाभार्थ्यांच्या याद्या तयार करून विविध विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे.शिबिरातून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल,यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे,असेही त्यांनी स्पष्ट केले.याशिवाय प्रत्येक विभागाने आपल्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र माहिती स्टॉल उभारावेत.स्टॉलवर माहितीपत्रके,घडीपुस्तिका आणि योजनांशी संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन शिबिरात येणाऱ्या नागरिकांना त्याचे वितरण करावे.यामुळे भविष्यात विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होईल,असेही जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी सांगितले.

बैठकीस उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कुंभार, सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक विश्वास करे,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुजित जाधोर,समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक शिवाजी फुलारी,प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.एस. कटकधोंड,लघु पाटबंधारे विभागाचे उपअभियंता एस.व्ही. नगदे,विविध महामंडळांचे जिल्हा व्यवस्थापक तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### तुळजापूरात कारची काचा फोडून दिड लाख चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत फिर्यादी नागराज सदानंद मडीवाळ, वय २९ वर्षे, रा. चिंचवाडा गाव पाली ता. बिचोली नॉर्थ जि. नॉर्थ गोवा यांचे स्कॉडा स्लाविया कार मध्ये पर्स मधील रोख रक्कम १,५०,००० व कागदपत्रे हे दि.१९.०७.२०२६ रोजी घाटशिळ पार्कींग येथे स्माशानभुमी रोडवर इदगाह जवळ तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने गाडीचा डाव्या बाजूचा काच फोडून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नागराज मडीवाळ यांनी दि.१९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### आडोशाला नेवून तिच्यावर केला लैंगीक अत्याचार

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १६ वर्षीय ६ महिनेची मुलगी मे २०२६ मध्ये हिस एका गावातील एका तरुणानी मोटरसायकलवर बसवून घेवून जावून गावातील पिराचे भिंतीच्या आडोशाला नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तु जर आजचा प्रकार तुझ्या आई वडीलांना सांगितला तर तुझ्या आई वडीलांना जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेचे आईने दि.१८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(१),६४(२)(के), ३५१(३) सह ४, ६, १०, १२ बा.लै.अ.सं. अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-नितीन प्रकाश धांडे, वय ३६ वर्षे, रा. कौठा बु. असेगाव बझार ता. ता. अकोट जि. अकोला, ह.मु. लोहारा बु. ता. लोहारा जि. धाराशिव यांची अंदाजे २५,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.१७.०७.२०२६ रोजी लोहारा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नितीन धांडे यांनी दि.१९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांचा मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत लखन वय ३३ वर्षे रा. गालीनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हे दि.१९.०७.२०२६ रोजी १८.१० वा. सु.आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र एमएच २५ एसी ३४९५ ही बार्शी ते कळंब जाणारे रोडवर येरमाळा ब्रिजखाली मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# धाराशिव लोकसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळेच्या २०३ वर्गखोल्यांना २२.१९ कोटीचा निधी मंजुर



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव लोकसभा मतदारसंघातील शासकीय व जिल्हा परिषद शाळांमधील जीर्ण व असुरक्षित वर्गखोल्यांचा प्रश्न खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत अतारांकित प्रश्न दाखल केला होता. यासंदर्भात केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री श्री. जयंत चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तर देत महत्त्वाची माहिती दिली आहे.

केंद्र सरकारच्या उत्तरानुसार, महाराष्ट्र शासनाने दिलेल्या माहितीनुसार धाराशिव लोकसभा मतदारसंघात (धाराशिव जिल्हा, लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुके तसेच सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुका) एकूण २८७ शासकीय व जिल्हा परिषद शाळांमध्ये जीर्ण अवस्थेतील वर्गखोल्या असुरक्षित असल्याची नोंद करण्यात आली आहे.

या समस्येच्या निराकरणासाठी केंद्रशासनाची समग्र शिक्षा अभियान आणि राज्य शासनाच्या विविध योजनेच्या समन्वयाने धाराशिव मतदार संघासाठी २०३ नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामास आर्थिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये एकूण २२.१९ कोटी (२२१९.११ लाख रुपये) आर्थिक तरतुदीसह मंजूरी देण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, महाराष्ट्र शासनाने १६ एप्रिल २०२५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे राज्य सरकारच्या योजना, केंद्र सरकारच्या योजना आणि कार्पोरेट सामाजिक जबाबदारी (उडठ) निधीच्या माध्यमातून पायाभूत सुविधांची कमतरता दूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच केंद्र सरकारने सर्व राज्यांना जीर्ण झालेल्या शाळा इमारतींचे सुरक्षा लेखापरीक्षण करून असुरक्षित इमारतींची तातडीने दुरुस्ती किंवा पाडकाम करण्याचे आणि सुरक्षित घोषित होईपर्यंत त्यांचा वापर बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

यामुळे धाराशिव लोकसभा मतदारसंघातील शाळांच्या सुरक्षिततेसाठी आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# माजी विद्यार्थी संदीप रमेश पाटील यांची समाज कल्याण सहायक आयुक्तपदी निवड



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- लोकसेवा आयोगाद्वारे समाज कल्याण सहायक आयुक्तपदी निवड धाराशिव तालुक्यातील राघुचीवाडी येथील कष्टकरी, शेतकरी कुटुंबातील माजी विद्यार्थी संदीप रमेश पाटील यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेव्दारे समाजकल्याण सहाय्यक आयुक्तपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल दि.२० जुलै २०२६ रोजी मदर कांचन कॉलेज धाराशिव येथे सत्कार करण्यात आला. राघुचीवाडी येथील संदीप पाटील हे शेतकरी कुटुंबातील आहेत. त्यांचे वडील दुधाचा व्यवसाय करतात. संदीप पाटील यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत, पाचवी ते दहावी श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये, मदर कांचन कॉलेज धाराशिव येथे राज्यशास्त्रात विषयात पदवी घेऊन त्यांनी भारती विद्यापीठात एमएसडब्लु केले. त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे समाजकल्याण सहाय्यक आयुक्तपदी निवड झाल्याने त्यांचा सत्कार श्री.अतुल अशोक अजमेरा (संस्था सचिव) केंद्र संयोजक श्री.राठोड सतिश, योगिता अजमेरा मॅडम, फलटणकर सर,करण भक्ते आदींनी संदीप पाटील यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# बोरीतील २०२ कुटुंबांना संविधान उद्देशिकेचे वाटप ; समाज कल्याण विभागाच्या योजनांची दिली माहिती



धाराशिव, ˆ (जिमाका) प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत निवड झालेल्या तुळजापूर तालुक्यातील बोरी गावातील कुटुंबांना आज सोमवारी (ता. २०) भारतीय संविधान उद्देशिकेचे वाटप करण्यात आले. समाज मंदिरात आयोजित कार्यक्रमात समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांवरील माहितीपर घडीपुस्तिका व पॉकेट बुकचेही वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,समाज कल्याण निरीक्षक श्री.अतुल जगताप, सरपंच श्रीकांत हावळे,उपसरपंच नारायण जानराव, पोलीस पाटील प्रवीण जानराव, ग्रामपंचायत सदस्या प्रेमा हावळे तसेच ग्रामपंचायत सचिव श्रीमती.ए.डी. थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी सांगितले की,समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती व बौद्ध समाजाच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. लाभार्थ्यांनी या योजनांची सविस्तर माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा आणि आपल्या जीवनमानाच्या उन्नतीसाठी त्याचा प्रभावी उपयोग करावा.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते कुटुंबप्रमुखांना भारतीय संविधान उद्देशिका,समाज कल्याण विभागाच्या महत्त्वपूर्ण योजनांवर आधारित 'समता दिनदर्शिका', 'आत्मनिर्भर' घडीपुस्तिका, सर्वसाधारण योजनांची माहिती देणारी 'विकासवाटा' घडीपुस्तिका तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यावरील पॉकेट बुक यांचे वितरण करण्यात आले.



बोरी गावातील सर्व २०२ कुटुंबांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून संविधान उद्देशिका व माहितीपर साहित्याचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे जागतिक बुद्धिबळ दिवस उत्साहात साजरा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक बुद्धिबळ दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक विकास, तार्किक विचारशक्ती, एकाग्रता आणि निर्णयक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बुद्धिबळ खेळाचे महत्त्व, इतिहास तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी बुद्धिबळपटूंच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे बुद्धिबळ खेळण्याचे महत्त्व सांगितले. बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विचारशक्ती, स्मरणशक्ती, नियोजन कौशल्य आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणारे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी या खेळाचे आंतरराष्ट्रीय खेळाडू मॅग्नस कार्लसेन ( नॉर्वे ), गॅरी कास्पारोव्ह ( रशिया), विश्वनाथन आनंद ( भारत ), डी. गुकेश ( भारत ) या खेळाडूंची थोडक्यात माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभ्यासाबरोबरच बौद्धिक खेळांमध्येही सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता पाचवी चे वर्ग शिक्षिक राजेंद्र कांबळे सर व कार्यक्रमाधिकारी सुप्रिया रायगुडे मॅडम यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने केले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हजरत दवाल मलिक साहेब व हजरत जिंदा शहा मदर साहेब दर्ग्यात फातेखानी; भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- शहरातील विजय चौक, दर्गा रोड, बागवान मोहल्ला येथील हजरत दवाल मलिक साहेब रहे. व हजरत जिंदा शहा मदर साहेब रहे. या पवित्र दर्ग्यांमध्ये शुक्रवारी दि.१७ रोजी श्रद्धा व भक्तिभावाच्या वातावरणात फातेखानीचा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला.


या प्रसंगी विशेष दुआ करण्यात आली. त्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या दर्गा व्यवस्थापन समितीच्या वतीने उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद (जेवण) आयोजित करण्यात आला. परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले व महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी कमिटीचे अध्यक्ष शफीक मजीद बागवान , असद खान मौलाना, सुल्तान कुरैशी, अशफाक बागवान, सद्दाम शेख, साबिर मोमीन, सिकंदर पटेल, अब्दुल माजले, कोंडाजी बागवान, इन्नूस बागवान, छोटू बागवान, फिरोज सैयद, मतीन बागवान, शमशेर पठाण, वाजिद शेख, नसरुद्दीन शेख, जमीर शेख, रिझवान सय्यद , अहमदुल्ला खान, सलीम पठाण, नेहाल पिरजादे, शेख तय्यब, राजू सैलानी, फेरोज शेख, सुरज सैलानी, गरीब नवाज शेख ,इमरान सैय्यद आणि शाहनवाज बागवान , पत्रकार आल्ताफ शेख उपस्थित होते.

यावेळी समितीच्या सर्व सदस्यांचे स्वागत शाल टोपी पुष्पगुच्छ देऊन वाजिद शेख यांच्या वतीने करण्यात आले. नव्याने स्थापन झालेल्या व्यवस्थापन समितीने दर्ग्याची नियमित देखभाल, स्वच्छता, धार्मिक परंपरांचे जतन तसेच दर्गा परिसरात आवश्यक विकासकामे हाती घेण्याचा संकल्प व्यक्त केला. भाविकांच्या सोयी-सुविधा वाढविणे, परिसर सुशोभित करणे आणि धार्मिक स्थळाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी समिती सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी समाजात शांतता, बंधुभाव आणि सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी दुआ केली.

# जनतेच्या विश्वासाला विकासाची जोड; अर्चनाताई पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाचा राज्यस्तरावर गौरव



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- जबाबदारीची जाणीव, कामावरील निष्ठा आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य या त्रिसूत्रीच्या बळावर धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी अल्पावधीतच आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे. अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी केवळ प्रशासकीय कामकाजापुरते स्वतःला मर्यादित न ठेवता, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना 'मराठवाडा सन्मान विशेष पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या वैयक्तिक यशाइतकाच धाराशिव जिल्ह्याच्या विकासाभिमुख वाटचालीचाही गौरव मानला जात आहे.

अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर अर्चनाताई पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागाचा नियमित आढावा घेण्याची पद्धत सुरू केली. कोणते काम रखडले आहे, कोणत्या योजनेला गती देण्याची आवश्यकता आहे आणि नागरिकांच्या कोणत्या समस्या तातडीने सोडवाव्या लागतील, याकडे त्यांनी सातत्याने लक्ष दिले. त्यामुळे विकासकामांना गती मिळावी आणि प्रशासन अधिक परिणामकारक व्हावे, यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांसोबत नियमित बैठका घेतल्या.

शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, ग्रामविकास आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य देत त्यांनी विकासाला केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे, गावागावांतील प्रश्न समजून घेणे आणि प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणे, ही त्यांच्या कार्यशैलीची ओळख बनली.

कामाच्या बाबतीत वेळेची बंधने न मानता अनेकदा उशिरापर्यंत कार्यालयात थांबून विकासकामांचा आढावा घेणे, प्रलंबित प्रस्तावांवर निर्णय प्रक्रियेला गती देणे आणि प्रत्येक काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करणे, या वृत्तीमुळे त्यांचे नेतृत्व अधिक ठळकपणे समोर आले. पदाचा वापर प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर विकासासाठी व्हावा, ही त्यांची भूमिका त्यांच्या कामातून दिसून येते.

अर्चनाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न झाला. जनतेच्या अपेक्षा ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी सातत्याने धडपड करणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. विकास हा केवळ घोषणांमधून नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून दिसला पाहिजे, या विचाराने त्यांनी अनेक उपक्रमांना चालना दिली.

राज्यस्तरावर मिळालेला 'मराठवाडा सन्मान विशेष पुरस्कार' हा त्यांच्या कार्याची झालेली दखल असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून विकासाला प्राधान्य देणाऱ्या कार्यपद्धतीचा सन्मान असल्याचे मानले जात आहे.

आजच्या राजकारणात पद मिळाल्यानंतर अनेकदा जनतेपासून दुरावा निर्माण होतो, अशी टीका होत असते. मात्र अर्चनाताई पाटील यांनी कामाच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विकासकामांबाबत सातत्य, निर्णयक्षमतेतील समतोल आणि प्रशासनाला दिशा देण्याची क्षमता यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक प्रभावी ठरत असल्याचे अनेकजण मानतात. धाराशिव जिल्ह्याच्या विकासाची गती कायम राखत, प्रत्येक कामात गुणवत्ता, पारदर्शकता आणि लोकहिताला प्राधान्य देण्याचा त्यांचा प्रयत्न पुढेही कायम राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यस्तरावर मिळालेला हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव तर आहेच, पण विकासाला वाहिलेल्या ध्यासाचीही मोठी पावती मानली जात आहे.

# नारायणगडच्या दिंडीचे गणेगावात स्वागत:१३ हजार वारकरी; गणेगाव ग्रामस्थांकडून भोजन, निवास व सेवाभावाने व्यवस्था



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आणि बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायणगड ते पंढरपूर ऐतिहासिक पायी दिंडी सोहळ्याचे भूम तालुक्यातील गणेगाव येथे शनिवारी (दि. १८ जुलै २०२६) सायंकाळी पाच वाजता आगमन झाले. दिंडीचे आगमन होताच गणेगाव ग्रामस्थांच्या वतीने बॅण्ड पथक, फटाक्यांची आतषबाजी आणि टाळ-मृदंगाच्या गजरात उत्साहात स्वागत करण्यात आले.

नारायणगड संस्थानचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा दिंडी सोहळा २१० किलोमीटरचे अंतर पार करून २३ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. या दिंडी सोहळ्यात आकर्षक सजावट केलेला रथ, मानाचा घोडा, दोन अश्व तसेच टाळकरी व मृदंगाचार्य सहभागी झाले आहेत. बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील श्री क्षेत्र संस्थान नारायणगड येथून पंढरपूरकडे निघालेला हा पायी दिंडी सोहळा गुरुवर्य महंत महादेव बाबा यांच्या परंपरेतून आणि नगद नारायणाच्या कृपाशीर्वादाने अनादी काळापासून अविरत सुरू आहे. यंदाही गुरुवर्य प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा मोठ्या उत्साहात मार्गक्रमण करीत आहे.

गणेगाव येथील बार्शी-पाथ्रुड रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. टाळकरी आणि वारकऱ्यांच्या उपस्थितीत दिंडीचे जल्लोषात स्वागत करून वाजत-गाजत हनुमान मंदिरासमोर आणण्यात आले. या दिंडी सोहळ्यात जवळपास १३ हजार महिला व पुरुष वारकरी सहभागी झाले आहेत. सर्व वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था जिल्हा परिषद शाळा तसेच मंदिर परिसरात करण्यात आली होती. ग्रामस्थांच्या वतीने गावातील प्रत्येक घरातून भाकरी व चपात्या जमा करण्यात आल्या. तसेच हनुमान मंदिराशेजारी भाजी व भाताचा महाप्रसाद तयार करण्यात आला होता.

संपूर्ण गावाने एकत्र येत वारकऱ्यांच्या निवास, भोजन व अन्य सुविधांची उत्तम व्यवस्था करून सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. रविवारी (दि. १९ जुलै) पहाटे महिला व पुरुष वारकऱ्यांनी स्नान करून चहा-पाणी घेतले. त्यानंतर साकत येथे न्याहारी करून पुढील मुक्कामासाठी बावचीच्या दिशेने दिंडी रवाना झाली.

संतांची शिकवण व गुरु परंपरा पुढे नेत आहोत : महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड संस्थानला मागील २०० वर्षांपासून पंढरपूर पायी दिंडीची मोठी परंपरा आहे. आषाढी किंवा कार्तिकी एकादशी असो, गुरुवर्य संतांच्या विचारानुसार गडाची गुरु परंपरा अविरत सुरू आहे. या पायी दिंडी सोहळ्यात वारकरी संप्रदायाची शिकवण दिली जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ महाराज यांच्या विचारांचा प्रसार व परंपरा पुढे नेणे हाच या वारीचा मुख्य उद्देश आहे, असे मत नारायणगड संस्थानचे मठाधिपती महंत गुरुवर्य शिवाजी महाराज यांनी व्यक्त केले.

# तुळजापूर येथे मद्यधुंद अवस्थेत मोटारसायकल चालवली: गुन्हा दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे नामे-महेश वय ३६ वर्षे, रा. मांतगनगर तुळजापूर ता. तुळजापूर जि.धाराशिव हे दि.१९.०७.२०२६ रोजी २०.३० वा. सु.आपल्या ताब्यातील मोटरसायकल ही विश्वनाथ कॉर्नर तुळजापूर येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


## लातूर समाचार धाराशिव

## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649